






दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो – अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९६ वा ● शुक्रवार, ता. १६ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


## निवडणूक आयोग 'दात नसलेला वाघ'

### रोहित पवार सोशल मीडिया पोस्ट चर्चेत

**पुणे । रयत समाचार**

महापालिकेच्या मतदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होत असल्याचे आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केले आहेत. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत निवडणूक आयोगावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

त्यासोबत त्यांनी दोन फोटो शेअर केले आहेत त्यात निवडणूक आयोग दात नसलेला वाघ असे कॅप्शन आहे. आमदार रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, मतदान प्रक्रियेत सुरुवातीपासूनच गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे. काही मतदान केंद्रांवर मतदान यंत्रणेत बिघाड झाल्याच्या तक्रारी समोर आल्या असून, मतदारांच्या बोटाला लावण्यात येणारी शाई लगेचच पुसली जात असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. यामुळे दुबार मतदानाची शक्यता नाकारता येत नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्याचप्रमाणे, मतदानाची टक्केवारी जाहीर करण्यातही मोठा विलंब होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अनेक मतदान केंद्रांवर दर दोन तासांनी मतदानाची टक्केवारी जाहीर केली जात नसून, ही बाब संशयास्पद असून, बोगस मतदारांसाठीच ही सोय तर केली जात नाही ना, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. रोहित पवार यांनी पुढे म्हटले आहे की, काही केंद्रांवर ईव्हीएम यंत्रणा क्रमवारीनुसार लावलेल्या नाहीत, तसेच दुबार मतदारांच्या नावासमोर असणारे डबल स्टार चिन्हही दिसून येत नाही.

त्यामुळे संपूर्ण मतदान प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निवडणूक आयोगाने या सर्व बाबींची तातडीने आणि गंभीर दखल घ्यावी. ठराविक वेळेनंतर मतदानाची टक्केवारी जाहीर करावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. ''आज मतदानाची शाई जशी पुसली जात आहे, तशी उद्या लोकशाही पुसली जाऊ नये,'' अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. या आरोपांमुळे महापालिका निवडणुकीच्या पारदर्शकतेबाबत राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, निवडणूक आयोगाकडून यावर काय भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिक्षण हे केवळ उपजीविकेचे साधन नाही, तर समाज व राष्ट्रसेवेचे माध्यम- राष्ट्रपती

**अमृतसर । रयत समाचार**




राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंजाबमधील गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे आयोजित दीक्षांत समारंभाला १५ जानेवारी २०२६ रोजी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, शिक्षण हे केवळ उपजीविकेचे साधन नसून समाज आणि राष्ट्रसेवेसाठीचे प्रभावी माध्यम आहे. राष्ट्रपती म्हणाल्या की, औपचारिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी विविध क्षेत्रांत वाटचाल करणार आहेत. कोणी सरकारी वा खासगी सेवेत, कोणी उच्च शिक्षण व संशोधनात, तर कोणी उद्योजकतेत किंवा अध्यापन क्षेत्रात कार्यरत होणार आहेत.

प्रत्येक क्षेत्रासाठी वेगवेगळी कौशल्ये आवश्यक असली तरी सातत्याने शिकण्याची जिज्ञासा, नैतिक मूल्ये, प्रामाणिकपणा, बदल स्वीकारण्याचे धैर्य, अपयशातून शिकण्याची वृत्ती, संघभावना, वेळ व साधनसंपत्तीचा शिस्तबद्ध वापर आणि वैयक्तिक फायद्याऐवजी समाजहितासाठी ज्ञानाचा उपयोग ही मूल्ये सर्व क्षेत्रांत समानपणे महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समाजाने दिलेल्या शिक्षणाच्या संधींचे ऋण फेडण्यासाठी विकासप्रक्रियेत मागे राहिलेल्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे ही जबाबदारी असल्याचे राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना सांगितले. गेल्या दशकात भारताने तंत्रज्ञान विकास आणि उद्योजकतेच्या संस्कृतीत लक्षणीय प्रगती केली असून कृषीपासून कृत्रिम बुद्धिमत्ता, संरक्षण ते अवकाश क्षेत्रापर्यंत युवकांसाठी विपुल संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. संशोधनाला चालना देणे, उद्योग, शिक्षण संस्था सहकार्य वाढवणे आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, यामुळे उच्च शिक्षण संस्था या प्रगतीला अधिक गती देऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.

पंजाबमध्ये अंमली पदार्थांच्या गैरवापराचे वाढते संकट समाजाच्या आरोग्य, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक रचनेवर परिणाम करत असल्याची चिंता व्यक्त करत, या समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यात शैक्षणिक संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे राष्ट्रपतींनी अधोरेखित केले. 'विकसित भारत' घडविण्यासाठी येणारी दोन दशके निर्णायक असून, वैज्ञानिक दृष्टिकोन, जबाबदारीची जाणीव आणि निस्वार्थ सेवेची भावना असलेले युवकच भारताचे भविष्य घडवतील, असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांनी कोणतेही क्षेत्र निवडले तरी त्यांच्या कार्यातून राष्ट्रबांधणी आणि मानवी मूल्ये बळकट व्हावीत, असे आवाहन त्यांनी केले. गुरु नानक देव विद्यापीठाची स्थापना श्री गुरु नानक देव यांच्या ५०० व्या जयंतीनिमित्त झाली असून, त्यांच्या विचारमूल्यांवर विद्यापीठाची वाटचाल सुरू असल्याचे राष्ट्रपतींनी सांगितले. गुरु नानक देवजींचे विचार हे सर्व मानवतेचे सामायिक वारसा असून, त्यांच्या आदर्शांमुळे समाजातील अनेक समस्यांवर मार्ग सापडू शकतो, असे त्यांनी नमूद केले. महिलांना समान अधिकार देण्याचा संदेश गुरु नानक देवजींनी दिला होता, याचा उल्लेख करत राष्ट्रपतींनी दीक्षांत समारंभात पदवी व पदक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये महिलांची लक्षणीय उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. महिलांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याच्या संधी मिळणे हे समाज आणि राष्ट्राच्या हिताचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



## अहिल्यानगरमध्ये शेकडो बनावट ओळखपत्रे; दोन संशयित ताब्यात

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानादरम्यान प्रभाग क्रमांक ३ मधील आनंद विद्यालय मतदान केंद्रावर बनावट निवडणूक ओळखपत्रांसह दोघांना पकडण्यात आले. त्यांच्याकडे वेगवेगळ्या नावांची शेकडो बनावट निवडणूक ओळखपत्रे आढळून आली असून प्रभागतील शिवसेनेचे (शिंदे गट) उमेदवार चंद्रकांत शेळके आणि विनय वाखुरे या प्रकारावर जोरदार आक्षेप घेत त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले.

पोलिसांनी संबंधित दोघांना ताब्यात घेतले असून चौकशी सुरू आहे. पीव्हीसी कार्ड स्वरूपात तयार करण्यात आलेल्या या बनावट ओळखपत्रांवर नावे व पत्ते नगर शहरातील असल्याचे दिसून येत असून त्यावर मात्र ग्रामीण भागातील व इतर व्यक्तींचे फोटो लावण्यात आले आहेत.

या माध्यमातून बोगस मतदान घडवून आणण्याचा डाव असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाबाबत प्रभाग क्रमांक ३ चे निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील यांनी सांगितले की, झालेल्या प्रकाराची निवडणूक प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. पकडलेल्या दोघांना तातडीने तोफखाना पोलीस ठाण्यात पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून त्यांची सखोल चौकशी सुरू आहे. चौकशीत निष्पन्न होणाऱ्या तथ्यांच्या आधारे पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## राष्ट्रकुल संसदीय परिषद लोकशाही सक्षमीकरणासाठी दिशादर्शक – प्रा.शिंदे



**नवी दिल्ली । रयत समाचार**

नवी दिल्ली येथे ता. १४ ते १६ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित राष्ट्रकुल संसदीय परिषदेसाठी (CPA) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे उपस्थित होते. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी महाराष्ट्र सदन येथे माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधून या जागतिक परिषदेचे महत्त्व आणि त्यामधील चर्चेच्या मुद्द्यांची माहिती दिली. राष्ट्रकुल संसदीय परिषदेच्या माध्यमातून भारताचा लोकशाहीचा वारसा जागतिक स्तरावर अधिक उजळून निघेल. तसेच ही परिषद लोकशाही सक्षमीकरणासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केला. ज्या देशांमध्ये लोकशाही आणि संसदीय व्यवस्था अस्तित्वात आहे, त्या सर्व देशांतील लोकशाही मूल्यांची जोपासना करणे हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. विविध देशांना भेडसावणाऱ्या अंतर्गत समस्या, त्यावरील लोकशाही मार्गाने काढलेले तोडगे तसेच वेगवेगळ्या संसदीय प्रणालींतील उत्तम उपक्रमांवर या परिषदेत सखोल मंथन होणार आहे. आपल्या संसदीय व्यवस्थेतील त्रुटी दूर करून ती अधिक लोकाभिमुख कशी करता येईल, यावर सर्व प्रतिनिधी विचारविनिमय करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



## तिसऱ्या मराठी राज्यभाषा साहित्य संमेलन कार्यक्रम पत्रिकेचे प्रकाशन

**आमोणे । रयत समाचार**

गोमंतक मराठी अकादमी व मराठी असे आमुची मायबोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी राज्यभाषा संमेलन २०२६ (तिसरे) रविवार, ता. १८ जानेवारी २०२६ रोजी नोनुज व्हिलेज, माशेल (फोंडा) येथे सकाळी ८.३० वाजता दिंडीने सुरू होणार आहे. या संमेलनाच्या संपूर्ण व्यवस्थेबाबत विचारविनिमय करण्यासाठी बुधवारी कार्यकर्त्यांची बैठक पार पडली.

या बैठकीत संमेलनाच्या कार्यक्रम पत्रिकेचे विमोचन संमेलनाचे कार्याध्यक्ष नोनु नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठी असे आमुची मायबोलीचे प्रमुख प्रकाश भगत यांनी संमेलनाच्या तयारीचा आढावा घेतला. या बैठकीला आयोजन समितीचे डॉ. मधु घोडकीरेकर, प्रभाकर ढगे, रेखा डायस, बाबली कांदोळकर, विठ्ठल रा. फडते, विनोद गावकर, अशोक लोटलीकर, रामदास भगत आदी उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी कार्याध्यक्ष नोनु नाईक यांनी रविवारच्या संमेलनास गोव्यातील सर्व मराठीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले.

## रवींद्र चव्हाण यांच्याकडून आचारसंहिता भंग

- निवडणूक आयोग झोपलाय की विकला गेलाय?
- संजय राऊतांचा निवडणूक आयोगावर हल्लाबोल

**मुंबई । रयत समाचार**





राज्यात २९ महापालिका निवडणुकांसाठी सुरू असलेल्या मतदानादरम्यान आचारसंहिता भंगाच्या घटनांवरून राजकीय वातावरण तापले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप करत निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली आहे. कल्याणडोंबिवली येथे मतदानाचा हक्क बजावताना रवींद्र चव्हाण यांच्या शर्टवर भाजपचे कमळ चिन्ह असल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. याच पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी सोशल मीडियावर फोटो शेअर करत आक्रमक भूमिका घेतली. ''निवडणूक आयोग झोपलाय की विकला गेलाय? छातीवर कमळ लावून मतदानास जाणे हा उघड आचारसंहिता भंग आहे. यावर काय कारवाई होणार?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यांचा संदर्भ देत, ''ठेचून काढण्याची भाषा करणारे मुख्यमंत्री आता काय कारवाई करणार?'' असा टोला लगावला. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी, संबंधित प्रकरणाची चौकशी करून आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. दरम्यान, मतदान प्रक्रियेतील कथित गोंधळ, आचारसंहिता भंग आणि टक्केवारी जाहीर करण्यातील विलंब यावरूनही संजय राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## गुरय्या स्वामी यांना राष्ट्रीय साहित्यसेवा भूषण पुरस्कार जाहीर

**नाशिक । श्रीकांत काकतीकर**



नाशिक येथील साहित्यकणा फाऊंडेशनतर्फे दिला जाणारा राष्ट्रीय साहित्यसेवा भूषण पुरस्कार सन २०२६ साठी कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष गुरय्या रे. स्वामी यांना जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा व साहित्याचा प्रचार, प्रसार आणि संवर्धनासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या साहित्यिकांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. कर्नाटक राज्यात गेल्या तीन दशकांहून अधिक काळ गुरय्या रे. स्वामी यांनी मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीत मोलाचे योगदान दिले आहे. हा पुरस्कार रविवार, ता. १ फेब्रुवारी २०२६ रोजी नाशिक येथे आयोजित राज्यस्तरीय साहित्यकणा संमेलनात समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल विविध साहित्य संस्था, कवी आणि साहित्यिकांकडून गुरय्या रे. स्वामी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांची गय नको– पालकमंत्री विखे

**शिर्डी । रयत समाचार**

प्रवरा नदीपात्रातून सुरू असलेल्या बेकायदेशीर वाळू उपशाबाबत महसूल व पोलीस प्रशासनाने कोणतीही गय न करता कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. लोणी येथे आयोजित जनता दरबारात त्यांनी नागरिकांच्या निवेदने स्वीकारून समस्यांचा आढावा घेतला. यावेळी वाळू उपशाच्या तक्रारींची गंभीर दखल घेत महसूल व पोलीस अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्यात आली. संबंधित भागातील तलाठी व मंडल अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून आवश्यक तेव्हा त्यांच्यावरही कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. शासकीय योजना व घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करताना कागदपत्रांची सखोल तपासणी करूनच निर्णय घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. आचारसंहिता शिथिल झाल्याने प्रलंबित विकासकामांना प्राधान्य देत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन पालकमंत्र्यांनी केले.

## जिल्ह्यातील आरोग्य सुविधांना बळकटी

### ३ ग्रामीण रुग्णालयांना १०० खाटांची मान्यता

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यातील अकोले, कोपरगाव आणि संगमनेर या तीनही तालुक्यांतील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करून त्यांचे १०० खाटांच्या रुग्णालयांमध्ये रूपांतर करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. आरोग्यमंत्री व शासन स्तरावर सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी शासन स्तरावर विशेष प्रयत्न सुरू असल्याचे सांगताना पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, तिन्ही तालुक्यांतील ग्रामीण रुग्णालयांचे १०० खाटांमध्ये रूपांतर व्हावे, अशी लोकप्रतिनिधी व नागरिकांची मागणी होती. या अनुषंगाने आरोग्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीनंतर श्रेणीवर्धनास मान्यता मिळाली असून, यामुळे रुग्णांना उपचारासाठी होणारा त्रास कमी होणार आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून सर्व उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांना औषधे व वैद्यकीय साधनसामग्रीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात सुमारे १८ कोटी रुपये निधीतून सुरू करण्यात आलेल्या 'कार्डियाक कॅथलॅब'चा रुग्णांना मोठा लाभ होत आहे. या लॅबमध्ये आतापर्यंत १३ रुग्णांची अँजिओग्राफी, ३ रुग्णांची अँजिओप्लास्टी तसेच ७७ रुग्णांची '२-डी इको' चाचणी यशस्वीपणे करण्यात आली आहे. याशिवाय गंभीर रुग्णांवर जिल्ह्यातच उपचार व्हावेत, यासाठी उभारण्यात येत असलेल्या 'क्रिटिकल केअर युनिट'च्या इमारतीचे काम सुमारे ६० टक्के पूर्ण झाले असून, लवकरच ही सुविधा रुग्णसेवेत दाखल होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार उपचार मिळावेत यासाठी आयुष्यमान भारत योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. सन २०२४–२५ या कालावधीत जिल्ह्यातील २४ हजार ४६४ लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेतला असून, उपचारापोटी शासनामार्फत संबंधित रुग्णालयांना ६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. जिल्ह्यात गर्भलिंग निदान चाचण्यांचे गैरप्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाला कडक निर्देश देण्यात आले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः या बाबीचा नियमित आढावा घ्यावा आणि अशा प्रकारांना आळा घालावा, असे निर्देशही पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी दिले.



# लोकशाही उत्सव

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६




अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर २००३ निरंतर नगरसेवा

# अहिल्यानगरीत लोकशाहीचा उत्सव साजरा



















समर्थ विद्यालय, आनंद विद्यालय, पाऊलबुद्धे महाविद्यालय आणि महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय या मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांनी उत्स्फूर्तपणे रांगा लावून मतदानाचा हक्क बजावला. ज्येष्ठ नागरिकांपासून तरुण मतदारांपर्यंत सर्वांचा सहभाग, तसेच सेल्फी पॉईंट व स्वाक्षरी फलकांवर दिसणारा उत्साह लोकशाहीतील जनसहभाग अधोरेखित करत आहे.

## अध्यात्म, पुस्तकवाचनातून वक्तृत्व सिद्ध करा– हभप उदागे



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शेवगाव येथे कै. सिंधूताई एकनाथराव विखे पाटील स्मृती राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. पारितोषिक वितरणप्रसंगी प्रमुख अतिथी ह.भ.प. गोरक्ष महाराज उदागे (संस्थापक, ज्ञानदा संस्कृत प्रबोधिनी, आळंदी देवाची) यांनी मार्गदर्शन केले. पुस्तकांचे सातत्याने वाचन करून भाषणात संदर्भ दिल्यास वक्तृत्व अधिक प्रभावी होते, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्षस्थानी प्रवरा शैक्षणिक संकुलाचे कार्यकारी संचालक सन्मा. पंजाबराव आहेर साहेब होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ यांनी केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक एस.एम. कॉलेज, वारजे (पुणे) येथील स्पर्धकाने 'उत्तम शेती कनिष्ठ का झाली?' या विषयावर भाषण करून पटकावला. द्वितीय क्रमांक बोडखे आकाश (विषय: 'स्त्री स्वातंत्र्यवास्तव की आभास'), तृतीय क्रमांक गावडे ऋतुजा हिने मिळवला. मोहिते आकाश व दसगुडे विश्वास यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. प्रथम क्रमांकासाठी रु. ५,००० रोख, फिरता करंडक, ट्रॉफी व प्रमाणपत्र; द्वितीयसाठी रु. ३,०००; तृतीयसाठी रु. २,०००; तर उत्तेजनार्थ प्रत्येकी रु. १,००० रोख, ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यशस्वी स्पर्धकांचे संस्थेचे अध्यक्ष सन्मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील, विश्वस्त सन्मा. सौ. सुवर्णाताई विखे पाटील, सहसचिव सन्मा. सौ. मोनिकाताई सावंत, विश्वस्त सन्मा. ध्रुव विखे पाटील व कार्यकारी संचालक सन्मा. पंजाबराव आहेर साहेब यांनी अभिनंदन केले. परीक्षक म्हणून प्रा. सोपान नवथर व दै. सकाळचे पत्रकार राजू घुगरे यांनी काम पाहिले. या स्पर्धेत पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातून सुमारे ४७ स्पर्धक सहभागी झाले. कार्यक्रमास आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष पवळे, सीबीएसई शाळेच्या प्राचार्या सौ. वर्षा दारकुंडे, डॉ. किरण वाघ, विकास समिती सदस्य बाळासाहेब देशपांडे व डॉ. कृष्णा देहाडराय आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रीती शिंगारे व प्रा. रामदास कातकडे यांनी केले, तर आभार प्रा. बबन पिसोटे यांनी मानले.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# अतिवृष्टीबाधित शेतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

## 'हिरकणी' महिला सक्षमीकरण उपक्रमाचे कौतुक



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ता. १४ जानेवारी रोजी शेवगाव तालुक्याचा दौरा करून अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतजमिनींसह विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित विभागांना आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना दिल्या. शेवगाव नगर परिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच शहराच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या जलकुंभाच्या कामाचा आढावा घेत कामाचा दर्जा व सद्यस्थितीची माहिती जाणून घेतली. ही दोन्ही कामे ठरलेल्या मुदतीत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. दौऱ्यादरम्यान ग्रामीण महिलांनी एकत्र येऊन सुरू केलेल्या 'हिरकणी कृषी सेवा केंद्रा'स जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली. महिलांनी कृषी क्षेत्रात उभारलेल्या या उद्योगाची माहिती घेत त्यांनी उपक्रमाचे कौतुक केले. उद्योगाच्या विस्तारासाठी तांत्रिक मार्गदर्शन व बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी महिलांना मार्गदर्शन केले. शेवगाव तालुक्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरडगाव परिसरातील शेतजमिनी मोठ्या प्रमाणात बाधित झाल्या होत्या. पुराच्या पाण्यामुळे खरडून गेलेल्या शेतजमिनीची जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या नापीक झालेल्या जमिनी पुन्हा लागवडीयोग्य करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत त्यांनी कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या दौऱ्यावेळी उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार आकाश दहाडदे, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# माऊली प्रतिष्ठानने शिक्षणासोबत सामाजिक दायित्व जपले- आ. ओगले

## विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शिक्षणासोबतच समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करून माऊली प्रतिष्ठानने आपले सामाजिक दायित्व प्रभावीपणे जपले असल्याचे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले. माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक ज्ञानेश्वर मुरकुटे व डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली वांगीभेर्डापूर येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व कृतज्ञता पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार भानुदास मुरकुटे होते. यावेळी नूतन नगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सचिन गुजर, उपजिल्हाधिकारी दत्तात्रय बोरुडे, अच्युत बडाख, बाबुराव बडाख, शांताराम तूवर, भरत साळुंके, विराज भोसले, नितीन भागडे, अर्जुन राऊत, योगेश उंडे, ताजखा पठाण, अरुण कवडे, बाबासाहेब तागड, भावना शिनगारे, नयन गांधी आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना कृतज्ञता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. युवा भूषण पुरस्कार ॲड. शुभम फरगडे (मोडी लिपी तज्ज्ञ), जीवनगौरव पुरस्कार चंदर बापू दासरजोगी (पाटील, वैदू समाज निपाणी), प्रगतशील शेतकरी म्हणून बापूसाहेब उंडे (मातापुर), सामाजिक कार्यासाठी हरणाबाई गो. चव्हाण (वारकरी कारेगाव), अध्यात्मिक क्षेत्रातील योगदानाबद्दल भगीरथीबाई की. गायधने (निपाणी वडगाव) तसेच समाजभूषण पुरस्काराने बाळासाहेब गायकवाड (वडाळा महादेव) यांचा सन्मान करण्यात आला. यावर्षीचे उत्कृष्ट विद्यार्थी व पालक यांनाही मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. आ. हेमंत ओगले पुढे म्हणाले की, समाजासाठी आदर्श निर्माण करणाऱ्या या सर्व व्यक्ती प्रेरणादायी असून सामाजिक, शैक्षणिक, कृषी, आध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल. माजी आमदार भानुदास मुरकुटे, नगराध्यक्ष करण ससाणे, सचिन गुजर व उपजिल्हाधिकारी दत्तात्रय बोरुडे यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. माऊली प्रतिष्ठानच्या माध्यमातून अशा कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान केल्याने समाजात सकारात्मक संदेश जात असून सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमास संजय कवडे, योगेश बडधे, पवन पाऊलबुधे, जालिंदर दाणे, सुनील भराडी, प्रकाश जाधव, शामसुंदर बडाख तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाथसंप्रदायाची नाथ जागृती यात्रा संपन्न


**पाथर्डी । नितीन गटाणी**




नाथसंप्रदायाची जागृती करणारी नाथ जागृती यात्रा ता. ११ ते १३ जानेवारी २०२६ दरम्यान यशस्वीरीत्या संपन्न झाली. या यात्रेचा प्रारंभ श्री गोरक्षनाथ गड येथून झाला. नेवासा येथील महंत हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या हस्ते यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा संदर्भ देत धर्मजागरणाचे महत्त्व विशद केले. समाजावर होणारे ख्रिश्चन धर्मांतर तसेच वक्फ बोर्डाच्या अतिक्रमणाचे अनिष्ट परिणाम त्यांनी स्पष्ट केले. यानंतर प्रांतीय संयोजक नितीन कमलापूरकर यांनी सांगितले की, ''नाथ जागृत आहेतच, मात्र नाथांच्या माध्यमातून समाजालाही जागृत करणे आवश्यक आहे.'' या प्रसंगी नाथसंप्रदायातील विविध साधू-संत व वारकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. सर्वांनी यात्रेला आध्यात्मिक आशीर्वाद दिला. भाविकांनी अंगावर भगवी उपरणी, गळ्यात आदेशधारी ओळखपत्रे व नाथमाळा परिधान करून यात्रेत सहभाग घेतला. या यात्रेला परिसरातील जनतेचा मोठा प्रतिसाद लाभला. मार्गातील प्रत्येक गावात यात्रेचे फुलवृष्टी, फटाके, रांगोळ्या व भव्य स्वागत करण्यात आले. घराघरांपुढे सजावट करण्यात आली होती आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या यात्रेचा समारोप देवगड येथील प्रकाशानंद गिरी महाराज यांच्या आशीर्वचनाने झाला. त्यांनी सांगितले की, ज्या उद्देशाने ही यात्रा सुरू झाली आहे, तो उद्देश निश्चितपणे पूर्ण होईल. ख्रिश्चन धर्मांतर आणि मंदिरांवर होणारे वक्फ बोर्डाचे अतिक्रमण ही खेदाची बाब असून हिंदू समाज यासाठी जागृत झाला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. तसेच धर्मांतराला बळी पडलेल्या कुटुंबांच्या स्थितीबाबत चिंता व्यक्त करत गोहत्या थांबवण्याची जोरदार मागणी केली. या नाथ जागृती यात्रेमुळे परिसरात नाथपरंपरा, धर्मजागरण आणि हिंदू समाजाच्या जागृतीबाबत मोठे जनचैतन्य निर्माण झाले आहे.

# हनुमान मंदिर सुशोभीकरणासाठी १० लाखांचा निधी मंजूर

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**



हिवरगाव पावसा येथील पुरातन हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असून मंदिर परिसरात संरक्षण भिंत व पेव्हिंग ब्लॉक सुशोभीकरणासाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या स्थानिक विकास निधीतून १० लाख रुपये मंजूर केले आहेत. संगमनेर भाजप उपाध्यक्ष केशव दवंगे यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. मंदिर परिसरात संरक्षण भिंत बांधणे व पेव्हिंग ब्लॉक बसविण्याच्या कामासाठी १० लाख रुपये निधी देण्याबाबतचे पत्र प्रा. राम शिंदे यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा नियोजन अधिकारी यांना दिले आहे. या निधीमंजुरीबद्दल भाजप जिल्हा पदाधिकारी काशिनाथ पावसे, गणेश दवंगे, सरपंच सुभाष गडाख, सुजाता दवंगे, सोमनाथ भालेराव, गणेश पावसे, प्रकाश पावसे, कैलास दिवटे, किरण पावसे, सुरेश पावसे, मच्छिंद्र पावसे, सचिन सस्कर, चंद्रशेखर गडाख, उत्तम जाधव, विलास पावसे, अशोक पावसे, अशोक गोफणे, बजरंग पावसे, रविंद्र पावसे, दिपक भालेराव, भाऊसाहेब बोऱ्हाडे, मच्छिंद्र गडाख, विनोद पावसे, माधव दवंगे, बाळासाहेब भालेराव, सोमनाथ दवंगे आदींसह हिवरगाव पावसा ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

# सभासद शेतकऱ्यांनी नागवडे कारखान्यास ऊस गळीतास देऊन सहकार्य करावे - राजेंद्र नागवडे

## श्रीगोंदा कारखान्याचे ४ लाख ७२ हजार ३४० मे. टन ऊस गाळप

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचा ५१ वा गळीत हंगाम सुरू असून सभासद व ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड मुकादम, मजूर, वाहतूकदार व ठेकेदार यांच्या सहकार्याने गाळप हंगाम अतिशय चांगल्या प्रकारे सुरू आहे. आजअखेर कारखान्याचे ४ लाख ७२ हजार ३४० मे. टन ऊस गाळप झाले असून सरासरी प्रतिदिन ६,५०० मे. टन ऊस गाळप होत आहे. कारखान्याचा गाळप हंगाम अजून सुमारे एक महिना म्हणजे १० फेब्रुवारीपर्यंत चालणार असल्याने सभासद शेतकऱ्यांनी थोडा संयम ठेवून आपला ऊस इतर कारखान्यांना न देता नागवडे कारखान्यास गळीतास देऊन सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले आहे.यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नागवडे यांनी सांगितले की, चालू गळीत हंगामात कारखान्याने उच्चांकी ३,१५० रुपये प्रति मे. टन ऊस दर जाहीर केला असून त्यापैकी पहिला हप्ता ३,००० रुपये आतापर्यंत अदा करण्यात आला आहे. नागवडे कारखाना ऊस दराबाबत कायम अग्रेसर राहिला असून सभासद शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात आला आहे.नागवडे पुढे म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी सभासद शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याची भूमिका सातत्याने घेतली. त्यांच्या विचारांचा व संस्कारांचा वारसा पुढे नेत कारखान्यामार्फत सभासद शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रयत्न केला जात आहे.सहकारी साखर कारखानदारीसमोर अनेक आव्हाने असली तरी त्यावर मात करून नागवडे कारखाना प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. नागवडे सहकारी साखर कारखाना ही तालुक्याची सहकार गंगोत्री असून विकासाची मूळ मातृसंस्था आहे. आतापर्यंतच्या वाटचालीत सभासद शेतकऱ्यांनी दिलेले सहकार्य भविष्यातही कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जेवढे जास्त गाळप होईल तेवढा संस्थेचा व सभासद शेतकऱ्यांचा फायदा होणार असल्याने किमान १० फेब्रुवारीअखेरपर्यंत सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस आपल्या कारखान्यास गळीतास देऊन सहकार्य करावे, असे आवाहन राजेंद्र नागवडे यांनी केले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल डोंगरगणचा शासकीय चित्रकला परीक्षेत १०० टक्के निकाल

**नगर तालुका । रयत समाचार**



न्यू इंग्लिश स्कूल, डोंगरगण येथील विद्यार्थ्यांनी शासकीय रेखा कला परीक्षा २०२५२६ मध्ये घवघवीत यश संपादन करत इतिहास घडविला आहे. शाळेतील सर्व सहभागी विद्यार्थी यशस्वी ठरले असून शंभर टक्के निकाल लागला आहे. ही उल्लेखनीय कामगिरी शाळा, शिक्षक, पालक तसेच संपूर्ण डोंगरगण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

इंटरमिजिएट परीक्षेत देवयानी भुतकर, श्रावण कदम, कीर्ती काळे, मानसी कदम, वैष्णवी मते, सोहम कदम, रामेश्वर मते, आदित्य डांगे, मनोज कदम, शिवम काळे यांनी यश संपादन केले. एलिमेंट्री परीक्षेत अनुष्का काळे, कीर्ती कदम, समीक्षा कदम, अक्षदा मते, वैष्णवी पाचारे, जानवी चांदणे, दीपक मते, अशोक कदम, ज्ञानेश्वरी कदम, श्रद्धा पवार, भाग्यश्री शिरसाठ, समृद्धी भुतकर, श्रावणी खेत्री, चैतन्य कदम, तेजस कदम, सोहम पठारे, समद शेख, रोहन गायकवाड हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे रामेश्वर ग्रामीण विद्या विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष जालिंदर कदम, सचिव महेश भराडिया, मुख्याध्यापक यशवंत भुतकर तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# प्रसादनगर सार्वजनिक शौचालय दुरुस्तीचा प्रश्न ऐरणीवर

## २६ जानेवारीला प्रहार जनशक्तीचे आंदोलन

**राहुरी । दत्ता जोगदंड**



प्रसादनगर परिसरातील सार्वजनिक शौचालयांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा ता. २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता या शौचालयांमध्ये साठलेला मैला वाजत-गाजत देवळाली प्रवरा नगरपरिषद कार्यालयात टाकण्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षातर्फे देण्यात आला आहे. यासंदर्भात प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष आप्पासाहेब ढूस यांनी ता. १ जानेवारी रोजी देवळाली प्रवरा नगरपरिषद, जिल्हा प्रशासन व पोलिस यंत्रणेला निवेदन दिले होते.

मात्र पंधरा दिवस उलटूनही नगरपरिषदेने कोणतीही दुरुस्ती न केल्याने, १५ जानेवारी रोजी आप्पासाहेब ढूस यांच्या अध्यक्षतेखाली २६ जानेवारी रोजी होणाऱ्या आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यासाठी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीत प्रसादनगर (राहुरी फॅक्टरी) भागातील नगरपरिषदेच्या दोन्ही सार्वजनिक शौचालयांची दयनीय अवस्था मांडण्यात आली. तुटलेले दरवाजे, बंद असलेले दिवे, अपुरा पाणीपुरवठा, फुटलेली भांडी तसेच तुंबलेले सेप्टिक टँक यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात आले. नगरपरिषदेने तातडीने दुरुस्तीचे काम हाती न घेतल्यास शेकडो महिला-पुरुषांसह प्रहार जनशक्ती पक्ष या अनोख्या आंदोलनावर ठाम राहणार असल्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. २६ जानेवारीपूर्वी शौचालयांची दुरुस्ती न झाल्यास, त्यातील मैला सार्वजनिक भांड्यामध्ये भरून वाजत-गाजत मिरवणुकीने देवळाली प्रवरा नगरपरिषद कार्यालयात नेऊन टाकण्यात येईल, असा ठराव बैठकीत करण्यात आला. या आंदोलनासाठी आवश्यक तयारी व कामांची विभागणीही पदाधिकाऱ्यांमध्ये करण्यात आली. या बैठकीस प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष आप्पासाहेब ढूस यांच्यासह श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघ प्रमुख चंद्रकांत कराळे, देवळाली प्रवरा शहर प्रमुख प्रकाश वाकळे, राहुरी फॅक्टरी महिला शहर प्रमुख रजनी कांबळे, उपप्रमुख अफसाना शेख, वंदना कांबळे, शहर संपर्क प्रमुख गणेश भालके, संघटक प्रभाकर कांबळे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# इराणमधील खोमेनी यांच्या सत्तेला सुरुंग

इराणमधील खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेला नागरिकांचा उद्रेक थांबायचे नाव घेत नाही. इराणमध्ये खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून जनतेचे मोठे आंदोलन चालू असून या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले आहे. या हिंसक आंदोलनात आतापर्यंत ५४४ जणांचा बळी गेला असून १० हजाराहून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. हजारो आंदोलकांना अटक व ५४ आंदोलकांचा बळी जाऊनही इराणी नागरिक खोमेनी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतच आहेत. खोमेनी सरकार हे आंदोलन चिरडण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे मात्र आंदोलक कोणत्याही परिस्थितीत आंदोलन थांबवण्याच्या मानसिकतेत नाही. तेथील परिस्थिती हाताबाहेर गेल्याने भारतानेही इराणमधील आपल्या नागरिकांना लवकरात लवकर इराण सोडण्याचे आव्हान केले आहे. खोमेनी सरकार उलथवून टाकायचेच अशा मानसिकतेत आंदोलक असल्याने हे आंदोलन आणखी भडकण्याची शक्यता आहे.

इराणमधील या आंदोलनाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या आंदोलनाला अमेरिकेची फ ूस असल्याची चर्चा जागतिक माध्यमात आहे. चीन, रशिया या देशांनी तर तसा थेट आरोपच केला आहे. अर्थात हा आरोप चुकीचा आहे असे कोणीही म्हणणार नाही. डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून इराणवर त्यांची वक्रदृष्टी होतीच. इस्राईल – इराण युद्धात ही अमेरिकेने इराण विरोधात भूमिका घेतली होती. इराणमधील खोमेनी सरकार उलथवून टाकणार असे ते कायम म्हणत आले आहेत. इराणमधील खोमेनी सरकार मानव अधिकारांचे उल्लंघन करीत असल्याने इराणवर अमेरिका हल्लाही करू शकते असा सज्जड दमही ट्रम्प यांनी इराणला दिला होता त्यामुळे इराणमधील या आंदोलनाला हवा देऊन खोमेनी यांचा परस्पर काटा काढण्याचा ट्रम्प यांचा डाव असू शकतो. व्हेनेझुएला प्रमाणे इराणमधील तेलसाठ्यावर देखील ट्रम्प यांची नजर आहे. खोमेनी अमेरिकेला ते सहजासहजी ते मिळवू देणार नाही म्हणून ते या आंदोलनाला धगधगत ठेवून खोमेनी यांचा काटा काढत आहे हे सत्य आहे. अमेरिका या आंदोलनाला पेटवत आहे हे जरी खरे असले तरी या आंदोलनाला खोमेनी हे स्वतःही तितकेच जबाबदार आहेत. रियाल हे इराणचे चलन आहे. रियालचे गेल्या काही वर्षात प्रचंड अवमुल्यन झाले आहे. १ लाख ४० हजार रियाल म्हणजे १ डॉलर अशी रियालची अवस्था झाली आहे. त्यामुळे येथील नागरिक भयचित झाले आहे. रियालचे अवमुल्यन झाल्याने तेथे महागाईचा कडेलोट झाला आहे. अन्नधान्य, औषधे आणि जीवनावश्यक वस्तू खरेदी करणेही नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. रियालचे अवमुल्यन होऊन महागाई प्रचंड वाढली, जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे देखील आवाक्याबाहेर गेल्याने नागरिक रस्त्यावर उतरले.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

वास्तविक या आंदोलनाची सुरुवात मागील महिन्यातच झाली होती. नागरिक रस्त्यावर उतरत असतानाही महागाई कमी करण्यासाठी आणि रियालचे अवमुल्यन रोखण्यासाठी खोमेनी यांनी कोणतेही पावले उचलली नाही त्याचा फटका त्यांना बसला. मागील महिन्यात तेहरान या इराणच्या राजधानीत सुरू झालेले हे आंदोलन आता इराणच्या ३३ प्रांतात पसरले आहे. हे आंदोलन आणखी वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे आणखी या आंदोलनात आणखी काही आंदोलनाचा जीव जाऊ शकतो. कदाचित हे आंदोलन खोमेनी यांचे सरकार उलथवूनही टाकेल. या आंदोलनाचा शेवट काय होईल हे येणारा काळच ठरवेल एकमात्र नक्की की या आंदोलनाने अनेक दशके सुरू असलेल्या खोमेनी यांच्या इराणमधील सत्तेला सुरुंग लागला आहे.



# शेवगावची राजकीय समीकरणे बदलली

## राष्ट्रवादीचे सिराजोद्दीन पटेल उपनगराध्यक्षपदी बिनविरोध

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव नगरपरिषदेतील उपनगराध्यक्षपदाची निवडणूक ही केवळ औपचारिक प्रक्रिया न राहता भाजपमधील अंतर्गत गटबाजी, विसंवाद व नेतृत्व अपयशाचे उघडे प्रदर्शन ठरली. ता. १५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत पार पडलेल्या निवड प्रक्रियेत भाजपचा पूर्ण पराभव झाला असून सत्तेपासून भाजप पूर्णतः वंचित राहिला आहे. उपनगराध्यक्षपदासाठी सागर फडके (भाजपा), नितीन दहीवाळकर (भाजपा), सिराजोद्दीन पटेल (राष्ट्रवादी अ.प.), निलेश रोकडे (राष्ट्रवादी अ.प.), आशुतोष डहाळे (शिवसेना) व वजीर पठाण (राष्ट्रवादी श.प.) असे सहा उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. सर्व सहा अर्ज छाननीत पात्र ठरले. मात्र निर्णायक टप्प्यावर सागर फडके, नितीन दहीवाळकर, निलेश रोकडे, आशुतोष डहाळे व वजीर पठाण यांनी एकामागून एक माघार घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नगरसेवक सिराजोद्दीन पटेल यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

या प्रक्रियेत भाजप पक्षातील अंतर्गत फाटाफूट स्पष्टपणे समोर आली. भाजपची एकी केवळ कागदावरच असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. भाजपच्या या गोंधळलेल्या राजकारणाचा थेट फायदा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व शिवसेना आघाडीला झाला असून ही निवड भाजपसाठी मोठा राजकीय धक्का मानली जात आहे. स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीतही भाजपची अवस्था नामुष्कीची ठरली. राष्ट्रवादीकडून अजिंक्य अरुण लांडे, तर भाजपकडून गणेश कोरडे यांची बिनविरोध निवड झाली. मात्र शिवसेनाराष्ट्रवादीकडून हरिश भारदे व साईनाथ आधाट यांनी अर्ज दाखल केल्याने चिठ्ठी प्रक्रियेची वेळ भाजपवर आली. समीक्षा मगर या लहान मुलीने काढलेल्या चिठ्ठीत साईनाथ आधाट यांची निवड झाली. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान भाजपचे सर्व नगरसेवक सभागृहातून बाहेर पडल्याने पक्षातील असंतोष, नाराजी व फाटाफूट उघड झाली. "भाजप स्वतःच स्वतःचा पराभव करत आहे," अशी चर्चा जोर धरू लागली आहे. निवड प्रक्रियेत नगरपरिषदेच्या अध्यक्ष मायाताई मुंढे यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले, तर निवडणूक निर्णय अधिकारी विजया घाडगे यांनी प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडली.

यावेळी अरुण मुंढे, संजय कोळगे, ताहेर पटेल तसेच भाजप वगळता सर्व नगरसेवक व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. या निकालामुळे शेवगाव नगरपरिषदेत भाजपच्या सत्तेचे स्वप्न पूर्णतः भंगले असून राष्ट्रवादीशिवसेना आघाडी अधिक भक्कम झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. अंतर्गत मतभेद वेळीच आवरले नाहीत तर त्याचे गंभीर राजकीय परिणाम आगामी निवडणुकांत भोगावे लागतील, असा इशारा राजकीय जाणकार देत आहेत. दरम्यान, भाजपराष्ट्रवादी (अजित पवार गट) युतीतील बिघाडी स्पष्ट झाल्याने शेवगावच्या राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाला आहे. "सर्वांना सोबत घेऊन शेवगाव शहराचा सर्वांगीण विकास करणार," असे प्रतिपादन नगराध्यक्षांनी या निवडीनंतर केले.

# डॉ. पाऊलबुधे तंत्रनिकेतनचे हिवाळी परीक्षेत सुयश


**अहमदनगर । विजय मते**

नारायणडोह येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. ना.ज. पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजच्या हिवाळी २०२५ परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. स्थापत्य, विद्युत व यंत्र अभियांत्रिकी विभागातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, प्राचार्य राजेंद्र देशपांडे, अभियांत्रिकी विभाग प्रमुख जाबीर अली, विद्युत विभाग प्रमुख प्रणिता करांडे, स्थापत्य विभाग प्रमुख जयश्री होले, संगणक विभाग प्रमुख प्रियंका अंबाडे, प्रथम वर्ष विभाग प्रमुख स्वाती गुंदेचा तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. प्रथम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये साद सय्यद याने ८७.०६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. विद्युत विभागात वैष्णवी काळे (७९.६५ टक्के), यंत्र अभियांत्रिकीमध्ये अंकुर मेहेर (७१.४३ टक्के) तर जागृती गावखरे हिने ८६.१४ टक्के गुण मिळवून विभागात प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय वर्षात स्थापत्य विभागात गायत्री वर्मा, विद्युत विभागात कुणाल देवकर, यंत्र विभागात संग्राम सावंत तर कृत्रिम बुद्धिमत्ता विभागात प्रतीक नागपुरे प्रथम आले आहेत. अंतिम वर्षात स्थापत्य विभागात विश्वजीत पवार (८५.४४ टक्के), विद्युत विभागात प्रज्योत घोंगडे (७८.४४ टक्के) तर यंत्र अभियांत्रिकीमध्ये रेहान शेख (८२.७१ टक्के) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. कॉम्प्युटर विभागातील तृतीय वर्षात दिव्या अंकाराम हिने ९१.२९ टक्के गुणांसह प्रथम, नीलम सय्यद ९०.८३ टक्के गुणांसह द्वितीय तर कृष्णा रंगाटे ९०.२४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. द्वितीय वर्षात वैष्णवी जगताप (८६.३५ टक्के) प्रथम, श्रुती घोरपडे (८४.८२ टक्के) द्वितीय तर अमजद शेख (८०.३५ टक्के) तृतीय आला. या सर्व विद्यार्थ्यांना कॉलेजचे प्राचार्य, सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असल्याचे सांगण्यात आले.

# टाकळी कडेवळीत रंगणार कुस्तीचा रणसंग्राम

## अहिल्यानगर जिल्हा महाराष्ट्र केसरी निवड चाचणी स्पर्धेला सज्ज

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



मातीचा सुगंध, गादीची शिस्त आणि पैलवानांची छातीठोक लढत टाकळी कडेवळी येथे शनिवारी रंगणार असून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ व अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने, तसेच श्रीगोंदा तालुका कुस्तीगीर संघ आणि टाकळी कडेवळीत ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्हा महाराष्ट्र केसरी निवड चाचणी कुस्ती स्पर्धा २०२५२६ आयोजित करण्यात येणार आहे. अहिल्यानगर येथे पार पडलेल्या बैठकीत स्पर्धेचे नियोजन ठरविण्यात आले असून शनिवारी स्पर्धा होणार असल्याची माहिती जिल्हा कुस्तीगीर संघाने दिली. या स्पर्धेत वरिष्ठ गटातील गादी व माती कुस्ती तसेच विविध वजनगटांतील जिल्हा केसरी निवड चाचण्या पार पडणार आहेत. स्पर्धा स्थळाची पाहणीही करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र केसरी व श्रीगोंदा तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष अशोक शिर्के, अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव व कुस्ती प्रशिक्षक प्रा. डॉ. संतोष भुजबळ, राष्ट्रीय कबड्डीपटू वैभव सुपेकर, पैलवान राकेश नवले यांच्यासह तालुका कुस्तीगीर संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या निवड चाचणीत अहिल्यानगर जिल्ह्यातील २०० ते २५० कुस्तीगीर विविध वजनगटांत आपले कौशल्य आजमावणार आहेत. विजेत्या पैलवानांना मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार असून हेच विजेते पुढे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत. म्हणजेच इथूनच राज्यपातळीचा रस्ता पैलवानांना मिळणार आहे. परंपरेची माती आणि आधुनिक व्यवस्थापन यांचा संगम असलेली ही स्पर्धा कुस्तीप्रेमींना पाहण्यास मिळणार असून, टाकळी कडेवळीत लवकरच 'धोबीपछाड'च्या गजरात इतिहास घडणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत अधिकाधिक पैलवानांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन टाकळी कडेवळीत ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.




# शिक्षणासोबतच आरोग्य हेही समाज उन्नतीचे महत्त्वाचे माध्यम– डॉ. पटेल

## फातिमा शेख जयंतीनिमित्त सर्वरोग निदान शिबिर

**अहमदनगर । आबीद खान**

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हे फातिमा शेख यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. ज्या काळात महिलांना, विशेषतः अल्पसंख्याक समाजातील महिलांना शिक्षणापासून दूर ठेवले जात होते, त्या काळात फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून शिक्षणाचा लढा दिला. त्यांच्या धैर्यामुळे आज अनेक पिढ्यांना शिक्षणाची दिशा मिळाली आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले हे सर्वरोग निदान शिबिर म्हणजे त्यांच्या विचारांना दिलेली खरी मानवंदना आहे.

शिक्षणासोबतच आरोग्य हेही समाज उन्नतीचे महत्त्वाचे माध्यम असून निरोगी समाजाशिवाय सशक्त राष्ट्र उभे राहू शकत नाही. फातिमा शेख यांचे विचार आत्मसात करून शिक्षण, आरोग्य व सामाजिक सेवेतून समाजासाठी कार्य करत राहणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे प्रतिपादन प्रसिद्ध डायबेटोलॉजिस्ट व हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अशफाक पटेल यांनी केले. अल करम हॉस्पिटल व मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका क्रांतीज्योती फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त अल करम हॉस्पिटल येथे सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शिबिरात डॉ. अशफाक पटेल यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. तपासणी झालेल्या सर्व रुग्णांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. यावेळी तौफिक तांबोली, शेरअली शेख, आबीद दुलेखान यांच्यासह सामाजिक व आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. फातिमा शेख यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले असून त्यांच्या विचारांना आरोग्यसेवेतून पुढे नेण्याचा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद खान यांनी केले तर आभार तौफिक तांबोली यांनी मानले.

# महापुरुषांच्या विचारांची आज समाजाला गरज– पोपट पवार

## प्रियदर्शनी पब्लिक स्कूलचा २५ वा वर्धापन दिन उत्साहात

**अहमदनगर । समीर मन्यार**

भिंगार येथील स्वामी विवेकानंद विद्या प्रसारक मंडळ संचलित प्रियदर्शनी पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज (इंग्रजी माध्यम) यांचा २५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास आदर्श गाव योजना महाराष्ट्र राज्य कार्यकारी अधिकारी तथा सरपंच पद्मश्री पोपट पवार आणि प्रसिद्ध सिनेअभिनेता, दिग्दर्शक व लेखक प्रवीण तरडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



कर्तृत्ववान व समाजाला दिशा देणाऱ्या महापुरुषांच्या जयंतीदिनी शाळेचा वर्धापन दिन साजरा होत असल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना पद्मश्री पोपट पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे कार्य प्रियदर्शनी पब्लिक स्कूल करत आहे. इंग्रजी माध्यमाच्या युगात मराठी भाषेचा विसर पडत चालला आहे. मराठी ही आपली मायभाषा असून ती जिवंत राहिली पाहिजे. भारतीय संस्कृती, परंपरा व इतिहास प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. समाजासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांच्या विचारांची आजच्या समाजाला नितांत गरज आहे, असे त्यांनी सांगितले. प्रवीण तरडे यांनी शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त व सर्वांगीण विकासाबाबत समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी ढोल–ताशा वादन, समूह नृत्य व कथ्थक नृत्याच्या माध्यमातून भारतीय संस्कृती जपण्याचा दिलेला संदेश स्तुत्य असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात शाळेच्या २५ वर्षांच्या शैक्षणिक प्रवासाचा प्रगती आलेख संगणकीय चित्रीकरणाद्वारे सादर करण्यात आला.

या सादरीकरणासाठी संगणक शिक्षक महेश वांढेकर यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. यावेळी तबला वादन शेखर दरवडे व हार्मोनियम वादन संगीता देऊळगावकर यांची संगीत साथ लाभली. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी ढोल–ताशा वादन, समूह नृत्य व कथ्थक नृत्याचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. नृत्यदिग्दर्शन पसपूल सर व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. याप्रसंगी विविध क्षेत्रात यश संपादन केलेले माजी विद्यार्थी, माजी प्राचार्य, माजी शिक्षक तसेच शाळेच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, प्राचार्या अंजली बोधक, उपाध्यक्ष अनिकेत खोमणे, संचालक रविंद्र केदारे, संचालिका सुनिता पांडरंग साठे, जयश्री खोमणे, सचिव शोभा खोमणे, उपप्राचार्य अमोल घोरपडे, पर्यवेक्षिका कु. अनिता थापा, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोकीम थोरात, शेहनाज व प्रियांका शेवाळे यांनी केले. आभार प्रदर्शन ललिता गुंड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब खोमणे व प्राचार्या अंजली बोधक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.